(अत्याधिक प्रयत्नशील असणाऱ्यात अग्र)

# सोण कोळिविस आणि सोणा

(मराठी)

विपश्यना विशोधन विन्यास

(अत्याधिक प्रयत्नशील असणाऱ्यात अग्र)

# सोण कोळिविस

*आणि*

# सोणा

(मराठी)

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी

**M41 - सोण कोळिविस आणि सोणा**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : जानेवारी २०२१

**मूल्य: ₹ ३५.००**

ISBN 978-81-7414-436-2

**प्रकाशक:**
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मागिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा: नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४९९८, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०,
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**
**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
जी-२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

## भगवान बुद्धांची उद्घोषणा

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं आरद्धवीरियानं यदिदं सोणो कोळिविसो ॥”**

**“एतदग्गं, भिक्खवे, मम साविकानं भिक्खुनीनं आरद्धवीरियानं यदिदं सोणा ॥”**

– *अङ्गुत्तरनिकाय (१.१.२०५,२४१)*

“भिक्षूंनो, माझ्या भिक्षू-श्रावकांमध्ये – अत्याधिक प्रयत्नशील असणाऱ्यात अग्र आहे सोण कोळिविस.”

“भिक्षूंनो, माझ्या भिक्षू-श्राविकांमध्ये – अत्याधिक प्रयत्नशील असणाऱ्यात अग्र आहे सोणा.”

# सोण कोळिविस आणि सोणा

# सोण कोळिविस आणि सोणा

## विषयानुक्रमणिका


**प्रकाशकीय........................................................7**

**सोण कोळिविस ................................................9**

जन्म आणि नामकरण.................................... 9

सोण कोळिविसची प्रव्रज्या ............................... 9

मध्यम मार्ग................................................ 11

अर्हत्व प्राप्तीचे सम्यक रीतीने केलेले वर्णन.......... 17

भिक्षुसंघाला पादत्राण वापरण्याची अनुमती......... 17

अतीत कथा ............................................... 18

**सोणा..........................................................20**

बहुपुत्तिकेची दुर्गती ........................................ 20

प्रयत्नशील सोणा.......................................... 20

आता पुनर्जन्म नाही ....................................... 22

सोणाचे अतीत............................................ 23

**विपश्यना साधना केंद्र........................................24**

# प्रकाशकीय

# प्रकाशकीय

भगवान बुद्धांचा उपदेश सगळ्यांसाठी एकसारखाच होता. मग तो पुरुष असो अथवा स्त्री; कोणत्याही प्रकारचा कोणताच भेदभाव नाही. जो या मार्गाने चालेल त्याला तत्काळ फळ देणारा आणि सर्वांना एकसारखेच फळ देणारा!

बुद्धांच्या उपदेशाचे अनुकरण करुन सोण कोळिविस आणि सोणाने एकसारखेच निर्वाणाचे फळ चाखले. भगवानांनी आपल्या भिक्षू श्रावकात तसेच भिक्षुणी श्राविकात क्रमशः आयुष्मान सोण कोळिविस आणि सोणाला अत्याधिक प्रयत्न करणाऱ्यात 'अग्र' ही उपाधि प्रदान केली.

**********

अंग देशातील चंपा निवासी सोण कोळिविसने भगवानांचा उपदेश ऐकला. उपदेश ऐकून ते अत्यंत प्रभावित झाले. भगवानांच्या शिकवणुकीविषयी त्यांच्या मनात अपार श्रद्धा जागृत झाली. भगवानांकडे त्यांनी प्रव्रज्येची मागणी केली. सोणने तत्काळ भगवानांकडून प्रव्रज्या प्राप्त केली. प्रव्रजित झालेले सोण परिश्रमपूर्वक तप करु लागले.

सोणचे शरीर अत्यंत कोमल होते. चंक्रमण करीत असताना त्यांच्या पायाला जखमा झाल्या. त्यामुळे सर्व चंक्रमण स्थळ रक्तमय झाले. त्यानंतर ते गुडघे आणि हाताच्या बळाने चंक्रमण करीत राहिले. तरीही त्यांना निर्वाण-मार्गावर कोणतीच उपलब्धी प्राप्त झाली नाही. सोणने प्रव्रज्येचा त्याग करुन गृहस्थ जीवनात परत जाण्याचा विचार केला. भगवानांनी त्याच्या मनातील विचार जाणले.

भगवानांनी स्वतः मध्यम मार्ग स्वीकारुन संबोधी प्राप्त केली होती. गृहत्याग करणाऱ्या अनेकांना भगवानांनी असेच शिकविले होते की त्यांनी कामभोगजन्य शिथिलतेच्या तसेच देहदंडाच्या निरर्थक व्रतांच्या तीव्रतेत पडू नये. यावेळी भगवानांनी सोणला समजाविताना सांगितले की, वीणेच्या

तारेला एवढे सैल सोडू नका की त्यातून झंकार निघणार नाही आणि एवढेही ताणू नका की तार तुटून जाईल. कारण अत्यंत प्रयत्नशील होणे अस्वस्थतेचे कारण बनते आणि अत्यंत सैल सोडणे आळसाचे कारण बनते. म्हणून दोघांच्या मधला मार्ग हा योग्य मार्ग आहे.

भगवानांच्या निर्देशानुसार तप करीत आयुष्मान सोणने लवकरच जाणले की जन्म क्षीण झाला, ब्रह्मचर्यवास पूर्ण झाला, करणीय समाप्त झाले आणि पुनर्जन्मासाठी काहीही शिल्लक राहिले नाही. आयुष्मान सोण अर्हंतांत एक झाला.

**********

अनेक संतती असलेल्या सोणा आपल्या संततींद्वारा उपेक्षित राहून वृद्धावस्थेत प्रव्रजित झाल्या. वृद्धावस्थेमुळे शिकविलेला धर्म त्या चांगल्या तऱ्हेने ग्रहण करु शकत नव्हत्या. त्यामुळे त्यांची मुले आणि अन्य भिक्षुणी त्यांना चिडवित असत. हे सर्व पाहून त्यांच्या मनात धर्म-संवेग जागृत झाला–“आपली गती सुधारणे आपल्याच हातात आहे.” दृढतापूर्वक परिश्रम करीत सोणाने लवकरच अर्हत्व अवस्था प्राप्त केली.

**********

भगवान बुद्धांच्या भिक्षू-श्रावकांच्या आणि भिक्षुणी-श्राविकांच्या जीवनातील प्रोत्साहन देणारे प्रसंग आपल्या सगळ्यांना प्रेरणेचे कारण होवो; ज्यामुळे विपश्यी साधक आणि साधिका त्यापासून स्फूर्ती घेऊन व आपल्या जीवनशैलीचे पुनरावलोकन करुन त्यात थोडीतरी सुधारणा करु शकतील. या मंगल भावनेसह या पुस्तिकेचे प्रकाशन केले जात आहे.

**विपश्यना विशोधन विन्यास**